# प्रेसनोट

लाप्र. विभाग, धुळे
दिनांक २९.०४.२०२६

**खाजगी इसम रामराव हरचंद पाटील रा. लोणपंचम व जितेंद्र राजेंद्र पाटील रा. झाडी, ता. अमळनेर यांनी यांनी तक्रारदार यांच्याकडे तहसिलदार यांच्या नावाने ५०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी एका ट्रॅक्टरचे २५,०००/— रुपये लाचेची रक्कम जितेंद्र पाटील यांनी स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **ला. प्र. विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्र.** | अमळनेर, जि. जळगांव पो.स्टे. गुरनं. २१२/२०२६ |
| **कलम व गुन्हा दाखल दि** | भ्र.प्र. कायदा कलम ७ — अ प्रमाणे, दि. २९.०४.२०२६ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | १. रामराव हरचंद पाटील, वय ६४ वर्षे, रा. लोणपंचम, ता. अमळनेर, जि. जळगांव,<br>२. जितेंद्र राजेंद्र पाटील, वय २६ वर्षे, रा. मु. झाडी, पो. शिरसाळे, ता. अमळनेर, जि. जळगांव, |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | २५,०००/— रुपये |

**<u>थोडक्यात हकिगत</u> :—** तक्रारदार यांचा गौण खनिज वाहतुकीचा व्यवसाय असुन तक्रारदार यांना त्यांच्या दोन ट्रॅक्टरने मौजे मांडळ येथील पांझरा नदीतुन वाळुची वाहतुक करु देण्यासाठी खाजगी इसम रामराव हरचंद पाटील व जितेंद्र राजेंद्र पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे तहसिलदार यांच्या नावाने प्रती ट्रॅक्टर २५,०००/— रुपये याप्रमाणे दोन ट्रॅक्टरचे ५०,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची दि.२८.०४.२०२६ रोजी पंचांसमक्ष पडताळणी केली असता रामराव हरचंद पाटील व जितेंद्र राजेंद्र पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे तहसिलदार यांच्या नावाने ५०,०००/— रुपये लाचेची मागणी केली.

त्यानंतर आज रोजी सापळा कारवाई दरम्यान रामराव हरचंद पाटील व जितेंद्र राजेंद्र पाटील यांना तक्रारदार यांच्याकडुन तहसिलदार यांच्या नावाने ५०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी एका ट्रॅक्टरचे २५,०००/— रुपये जितेंद्र पाटील यांनी पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात येवुन त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| **पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **सापळा अधिकारी** | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **तपास अधिकारी** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **सापळा पथक** | पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, प्रविण मोरे, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, चंद्रकांत सैंदाणे, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, पोकॉ. जगदीश बडगुजर |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**<u>"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"</u>**

**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :— १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :— ०२५६२—२३४०२०
**व्हॉटसअॅप क्रमांक** :— ७७९८१६१०६४